# प्रेसनोट

नाशिक,
दिनांक : १४/११/२०१८

**आलोसे विलास काशिनाथ पाटील, पोलीस नाईक, ब.नं.२५१५ हल्ली नेमणुक पोलीस उप अधीक्षक पेठ, कॅम्प त्रंबकेश्वर यांचे कार्यालय, जि.नाशिक ग्रामीण यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये लाच मागणी केल्याने गुन्हा दाखल केले बाबत.**

---

यातील तक्रारदार यांचे त्रंबक जव्हार रोडवरील यशराज हॉटेल रात्री उशिरापर्यंत चालु राहात असल्याने पोलीस कारवाई न करण्यासाठी व हॉटेल चालु ठेवण्यासाठी आलोसे विलास काशिनाथ पाटील, पोलीस नाईक, ब.नं.२५१५ हल्ली नेमणुक पोलीस उप अधीक्षक पेठ, कॅम्प त्रंबकेश्वर यांचे कार्यालय, जि. नाशिक ग्रामीण. यांनी दि.१०/११/२०१८ रोजी तक्रारदार यांचेकडे पोलीस उप अधीक्षक श्री.पाटील यांच्या नांवे दरमहा ५,०००/—रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम त्रंबक जव्हार रोडवरील तक्रारदार यांच्या यशराज हॉटेल समोर आलोसे पोना/पाटील यांनी आणलेल्या स्वीप्ट डिझायर कार क्र.एम.एच.१५ एफ एन २२५६ मधील ड्रायव्हर सिटवर स्विकारली असल्याबाबतची व्हिडीओ क्लिप तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक कार्यालयात सादर केली असून त्यामध्ये आलोसे पाटील हे तक्रारदार यांचेकडून लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारतांना स्पष्टपणे दिसत असल्याने तक्रारदार यांनी आलोसे विलास काशिनाथ पाटील, पोलीस नाईक, ब.नं.२५१५ हल्ली नेमणुक पोलीस उप अधीक्षक पेठ, कॅम्प त्रंबकेश्वर यांचे कार्यालय, जि.नाशिक ग्रामीण यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक कार्यालयात तक्रार दिल्याने त्यांचे विरुध्द आज दि.१४.११.२०१८ रोजी त्रंबकेश्वर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅंडलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | टोल फ्री नंबर |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८, २५७८२३० | १०६४ |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | १०६४ |
| ३ | धुळे | ०२५६२—२३४०२० | १०६४ |
| ४ | नंदूरबार | ०२५६४—२३०००९ | १०६४ |
| ५ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | १०६४ |

( विश्वजीत जाधव )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता